Vol 4 Issue 8 Feb 2015 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-8 | Feb-2015
Available online at www.aygrt.isrj.org

# छत्रपती शिवाजी महाराज व संत तुकाराम महाराज यांच्यातील वैचारीक साम्य एक चिकीत्सा

प्रशांत कोठे

इतिहास विभाग प्रमुख , श्री शिवाजी कला, वाणिज व विज्ञान महाविद्यालय, आकोट.

**सांराश :** पराभूत मानसिकतेमध्ये असहयतेचे लाजीरवाण जीवन जगत असलेल्या महाराष्ट्रातील समाजा मध्ये कांतीचे सर्वप्रथम स्फुल्लींग चेतविनारे, स्वातंत्र्याचा जयघोष करणारे,,समतेचा आग्रही पुरस्कार करणरे, अण्याला कापरे भरवीनारे छत्रपती शिवाजी महाराज हे भारताच्या इतिहासातील एक महान राष्ट्रपुरुष ठरतात. शेकडो वर्षाची पाशवी गुलामगीरी, ग्रामीन समाजजीवनाची अमाणुष पीळवणुक करणारी चीरेबंदी पण भावनाशुन्य सरंजामी राजवट अगदी अल्पावधीत, ते ही अगदी सामान्य लोकांच्या मदतीने असामान्य लाकांच्या शौर्य–धैर्य दाखवून नितीचं, न्यायाचं परंतू बलशाली अशा इथल्या मातीतल्या प्रत्यक माणसाला स्वतःच वाटावं अस 'स्वराज्य' निर्माण केल. हे अगदी अशक्यकोटीतील कार्य होय. हयाची भारतीय इतिहासकारांपेक्षा (काही अपवाद) इंग्रज, पोर्तूगीज, डच, फ्रेंच, हयासारख्या परकीय इतीहासकारांनी एक महान कांतीकारी घटना म्हणून नोंद केली. ती का ? पराकम म्हणून.... छे! छे!जगज्जेता सिकंदर, नेपोलीन एवढेच नव्हे तर ज्यांच्या साम्राज्यावर सूर्यही कधी मावळत नव्हता. अशा जगज्जेत्यांना पराकमाची ती काय नवलाई!

## *प्रस्तावना :*

नवलाई ती हीच की, त्यांच्या पराकमात कपट होते. तर इथल्या पराकमाला नैतिकतेचे अधिष्टान होते. न्यायाची झालर होती. निष्टेची जोड होती. सामान्य खेडूताचे शोषण करणा–या मुजोर वतनदारांना त्यांनी कशाचाही मुलाहीजा न बाळगता, काणत्याही ब–यावाईट परीणामाची पर्वा न करता वटनीवर आणले. शिलभ्रष्ट धनदांडग्या जहागीरदार, वतनदारांना शोषित अशा स्त्रीवर्गाला सनमानाची व न्याची अनुभुती दिली. हया सर्वमानवी मुल्यांची जोपासना करीत असतांना स्वराज्याचा अगदी शेवटचा प्रजाजण डोळासमोर ठेवून त्याच्या हीताला, सन्मानाला ठेच पोहचनार नाही, याची डोळात तेल घालुन महाराजांनी काळजी घेतली. हया उदात्त कार्याची प्रेरणा त्यांना कोठून मिळाली. हा एक चिंतनाचा विषय आहे. हया विषयी महात्मा ज्योतीराव फुलेंनी अगदी स्पष्ट शबदात सांगीतले आहे.

''मासा पाणी खेळे, गुरु कोण असे त्याचा ''[1]

त्यांच्या मते परमतेजस्वी शहाजीराजांचा स्वयंभू पराकम व दृढनिश्चयी जिजाऊ मॉसाहेबांच्या संस्कारातूनच शिवाजीराजे घडले. हे त्रीवार सत्य आहे की, आई ही बालकाचा प्रथम गुरु असते. तीच त्याला अगदी बोबडया बोलांपासून सर्व काही शिकविते. परंतु जीजामातेचे कार्य हे इतर सामान्य मातांपेक्षा अतिउच्च प्रतीचे आहे.

त्याच काळात अशिक्षित ग्रामिण समाजाला निराशेच्या घोर अंध;कारातून बाहेर काढण्यासाठी संत तुकाराम हे विज्ञानवादी, परिवर्तनवादी सत्पुरुष अविरत झटत होते. त्यांचे समाजसुधारणेचे कार्य आणि शिवाजी राजांच्या स्वराज्य स्थापनेमागचा हेतू हया दोघांच्या विचार–कार्यात पुष्कळसे ससम्य आहे. त्या पुष्टयर्थ काही प्रसंग दिले आहेत.

***1) परस्त्री मातेसमान*** :– तुकाराम महाराजांचे साध्या, भोळया जनतेला किर्तनाच्या माध्यमातून जागृत करण्याचे कार्य अव्याहतपणे सुरुच होते. त्यानी यज्ञ–याग, होम–हवन, संस्कृत वेद पठाण हयाद्धारे आम जनतेला दुबौध व खचिक झालेला ईश्वर–

गळयात तुळशीची माळ, हाती टाळ मृदंग विणा।

मुखाने फक्त विठ्ठल विठ्ठल म्हणा।।

हया दवारे अगदी सहज सोपा केला. तसेच आपल्या अभंगातून कर्मकांड, अंधश्रदधा, अनिष्ट रुढीए परंपरा, जातीभेद यावर प्रहार केले. परिवर्तनवादी, डोळस विचार जनमानसात पेरले. त्यामुळे ज्याची समाजाला लुबाडण्याची दुकानदारी बंद झाली, अशा समाजदवेष्टयांचा जळफळाट झाला. त्यांनी तुकोबांना बदनाम करण्यासाठी त्यांचेकडे एके रात्री वेश्येला पाठविण्याचे निच कृत्य केले. परंतू तुकोबांच्या चित्तात कोणतीही वासना निर्माण न होता. ते त्या वेश्येला,

''जाई वो तु माते, ना करी सायास ।
आम्ही विष्णुदास तैसे नोहे।।[2]

आणि एके ठिकाणी स्त्रीविषयीचा पवित्र भाव प्रदार्शित करतांना म्हणतात–

''परिवया नारी माऊली समान ।''[3]
मनलीया धन काय वेंचे।।1।।

अगदी तसाच किंवा त्याहीपेक्षाकठीण परीक्षा घेनारा प्रसंग शिवाजी राज्यांच्या जीवनात घडला. आबाजी सोनदेव नावाच्या सरदाराने कल्यानच्या आदीलशाही सुभेदार मुलाना हयाती[4] याची लावण्यवती सुन अगनीत लुटीसह राजांना पेश केली. आसमानी सौंदर्याने लब्ध शत्रुच्या स्त्रीला बघुन राजांनी यत्कींचीतही विचलीत न होता, तीला आईच्या भावनेतुन पाहीले. तिची साडीचोळीनिशी बाईज्जत पाठवीनी केली. आपल्या हया निच कृत्याबदल खरडपट्टी काढली. ''स्त्रीयांची इज्जत कायम राहीली पाहीजे.''[5] ही त्यांची निती होती.त्या संदर्भात आपल्या नोकर, सैनिकांना महाराजांनी सकत हूकुम दिला होता की, ''मोहीमेस जातांना कुणाही स्त्रीस बटकिण बनविता कामा नये.''[6] वरील प्रसंगावरुन दोघांच्याही विचाराची नैतिक पातळी समाण होती. हे प्रकर्षाने जाणवते.

***2) स्वातंत्र्य, समता, न्यायासाठी लढाः***– बंधूभाव, समता, न्यायासाठी अहोरात्र झटणारे तुकाराम महाराज कधी कधी कठोर होतात. एक क्रांतीकारी संत म्हणून त्यांचेकडे पाहीले जाते. समाज गुंडांना दम भरण्याा साठी ते म्हणतात,

''मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास।
कठिण व्रजास भेदू ऐसे ।।[7]

त्याच प्रमाणे सज्जनांच्या रक्षणासाठी, दीन–दलीतांसाठी, रंजल्या–गाजल्यांसाठी आम्ही आमचे सर्वस्व अर्पण करु पण बदमाशांसाठी आम्ही कर्दनकाळ बनून राहू, अशाप्रकारचा धैर्यशाली संदेश ते आपल्या अनुयांना देतांना म्हणतात.

''भलेतरी देऊं गाठीची लंगोटी ।
नाठाळाचे काठी देउं माथा।।[8]

तेच हेतू स्वराज्याच्या स्थापन्यामागे शिवाजी राजांचा होता. भुमी पुत्रांच्या, सामान्य प्रजेच्या हीता आड येना–या तत्कालीन आदीलशाही, मुघलशाही मांडलीक जहागीरदार चंद्रराव मोरे, बाजी घोरपडे, सूर्याजी पिसाळ, खंडोजी खोपडे या सारख्या मातब्बर स्वकीयांना तसेच आदीलशाही, मोगल, डच, फ्रंच, सिद्दी इत्यादी परकीय नाठाळांना नामोहरम केले. स्वराज्याला लोकराज्याची दृष्टी देवून त्या पवित्र कार्याच्या आड येणा–या अफजलखानाला कायमचे संपवले. शाहीस्तेखानाला कायमची अदल घडविली. जसवंतसिंगाला पळता भूही थोडी केली. न्याय, समता प्रस्तापीत करणारा त्यांचा आदेश सभासद बखरीत पाहायला मिळतो. ''रयतेस गुलाम करणा–या देशमुख, देशपांडे वतनदार ग्रामाधिका–यांचे वाडे, हूडे, कोट पाडून महाराजांनी जीमणदोस्त केले व त्यांनी इतःपर असे धंदे करु नयेत, इतर रयते सारखी साधी घरे बांधून राहावे.''[9] असे सांगीतले.

***3) पर्यावरण रक्षणातच मानवाचे हित शोधले :***– चारशे वर्षाआधी तुकाराम महाराजांना पर्यावरणाचे मानवी जीवनातील महत्व समजले होते. निर्सगाचा समतोल साधल्या गेला तरच माणुस भरल्या पोटी राहील हे मर्म त्यांनी जानले. म्हणून पर्यावरण रक्षणाविषयी ते कळकळचे आवाहन करतांना म्हणतात.

''वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे।
पक्षी सुस्वरे आळविती।।''[10]

मधुर फळे, शुदघ हवा, औषधी, छाया, सौंदर्य प्रदान करणारे वृक्ष–वेली आमचे खरे सगे सोयरे आहेत. त्यांचे जतन करा. वृक्षतोड करु नका. अगदी तसाच आदेश शिवाजी राजे आपल्या मामलेदारांना, अधीकारी, सैनिकांना देतांना म्हणतात, ''स्वराज्यातील आंबे, फणस हे लाकडे आरमाराच्या प्रयोजनाची. परुंतू त्यास हात लावू नये. काय म्हणूण तर ही झाडे वर्षा दोन वर्षात

होतात असे नाही. रयतांनी हे झाडे लावून लेकरासारखी बहुतकाळे जतन करुन वाढविली. त्यांचे दुःखास पारावार काय? कदाचीत एखादे झाड बहूत जीर्ण होवून कामातून गेले असेल. तरी त्याचे धन्यास राजी करुन घेवून द्रव्य देवून त्याचे संतोषे तोडून घ्यावे.''[11] येथे पर्यावरण रक्षणासोबत शेतक–या विषयी कळवळा सुदघा प्रकर्शाने जाणवतो.

***4) जगाच्या पोशिंदयाची काळजी :–*** शेतक–यांच्या जीवनात शेतीला कीती महत्व आहे ते तुकोबा आपल्या पुढील अभंगात सांगतात,

''मढे झाकोनिया करिती पेरणी।
कुणबियांचे वाणी लवलाहे।।[12]

म्हणजे कितीही दुःखद वा कठीण प्रसंग आला तरी शेतक–याने आपल्या निहीत कायापासेन जराही ढळू नये. कारण शेतीशिवाय आपला व जगाचा उदरनिर्वाह होणार नाही. हाच उदात्त हेतू त्यांना वरील अभंगातून सांगायचा आहे. शिवाजी महाराजांना सुदधा सामाण्य प्रजा शेती शिवाय जगू शकनार नाही. हे चांगल्या प्रकारे माहीत होते. ते त्यांच्या दैनंदिन जीवनाशी एकरुप झाले होते. अंदाजे 1640–42 चा काळ असेल. आदीलशाही सरदार मुरार जगदेव याने पूणे परीसरात लूट जाळपोळ करुन दहशत पसरवली. पूणे जहागीरीत वास्तव्य करण्यास, शेती करण्यास मज्जाव केला. लोखंडी पहार ठोकून त्यावर उलटी वाहण लटकवून जो कोनी वरील नियम तोडेल त्याचा निर्वंश करण्यात येईल. अशी धमकी दिली. परिणामी पूणे जहागीरी ओस पडू लागली. तेंव्हा शिवाजी राजांनीवयाच्या 12–13 व्या वर्षी जीजाबाईच्या साहयाने स्वता नांगर हातात घेवून शेत नांगरले व मुरार जगदेवचे आव्हान स्विकारले. शिवाजीच्या पाठबळाने मावळ खो–यातील जनता परत पूणे परीसरात वास्तव्यास येवून शेती करु लागली. उजाड परीसर पून्हा नव्या जोमाने फूलु लागला. शेतक–यांना कसण्यासाठी शेती, पिके उभारण्यासाठी बिनव्याजी कर्जे दिली. शक्य तेथे बंधारे बांधून सिंचनाचीही सोय केली. शेतक–याला आर्थिक साहाय द्यावे असे एका पत्रात म्हटले आहे, ''ज्याला सेत करावयास कुवत आहे आणि त्याला जोतास बैल, नांगर, पोटास दाणा नाही, त्यावीण तो आडोन निकामी जाला असेल, तरी त्याला रोख पैके हाती घेऊन दो चौ बैलांचे द्यावे, बैल घेवावे.''[13] वरील प्रसंगावरुन दोघांनीही शेतात राबना–या पोशिंदाचा कळवळा होता. शेती व्यावसाय वाढीस लागला पाहीजे या साठी अधिका–यांना तशा सूचना दिल्या होत्या.शेतकरी सुखी तर राजा सुखी. देश सुखी ही त्यांची तळमळ दिसून येते.

***5) वैज्ञानिक दृष्टीकोन :–*** तुकोबा हे विज्ञानवादी संत होते. त्यांनी लोकांना अंधश्रदधा, जादूटोणा, अंगारे–धुपारे, देव अंगात येणे, नवस करने हया अनिष्ट गोष्टींवर विश्वास ठेवू नये असे परोपरीने समजावून सांगीतले. ते म्हणतात,

''नवसे कन्यापुत्र होती।
तो का करणे लागे पती।।[14]

अगदी त्याच प्रकारचे विचार शिवाजी महाराजांचे होते. ते आपल्याला राजारामाच्या जन्म प्रसंगावरुन लक्षात येते. राजाराम पालथे जन्माला आले. सर्वजण ते पाहून गप्प बसले. राजपरिवारातील मंडळी काळजीत पडली. तेव्हा महाराज हसले आणि अगदी सहज म्हणाले, '' अहो, बाळराजे पालथे जन्माला आले, ते दिल्लीची मोगल पातशाही पालथी घालतील''[15] मग सगळे आनंद व्यक्त करु लागले. केव्हठा हा पुरोगामी विचार होता.

अशा अनेक प्रसंगा वरुन संत तुकाराम महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारात व कार्यात साम्य दिसून येते. त्या दाघांचेही ध्येय सारखे असल्याचे दिसून येतात. त्यांनी जनतेच्या उधारासाठी प्रबोधनाचे कार्य कले. हे दीसून येते. म्हणूच ते शिवाजी महाराजांचे गुरु ख–या अर्थाने शोभतात.

***संदर्भ :–***

1.धनंजय किर (संकलन) – महात्मा फुले यांचे समग्र वाङःमय पृ.क. 7,38
2.संत तुकाराम गाथा पृ. क. 96
3.संत तुकाराम गाथा पृ. क. 96
4.भावे वा. कु. –शवकालीन महाराष्ट्र पृ. क. 72,73
5.बाकसकर (सं.) 91 कलमी बखर पृ. क. 144
6. Jadhunath Sarkar - Shivaji and his times p. 365
7.संत तुकाराम गाथा पृ. क. 286
8.संत तुकाराम गाथा पृ. क. 287
9.सभासद बखर पृ.क. 26
अ.रा.कुलकर्णी – शिवकालीन महाराष्ट्र पृ. क. 74,75
10.संत तुकाराम गाथा पृ. क. 606

11.जोशी प्र. न. (संकलन) आज्ञापत्रे– रामचंद्र अमात्य पृ. क. 43,44
12.अ.रा.कुलकर्णी – शिवकालीन महाराष्ट्र पृ. क. 54 संत तुकाराम गाथा पृ. क. 260
13.शिवचरित्र साहित्यखंड 9 पृ.क. 55 अ.रा.कुलकर्णी – शिवकालीन महाराष्ट्र पृ. क. 52
14.संत तुकाराम गाथा पृ. क.
15.सभासद बखर पृ.क. 65



*प्रशांत कोठे*
इतिहास विभाग प्रमुख , श्री शिवाजी कला, वाणिज व विज्ञान महाविद्यालय, आकोट.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org